आकाशवाणी पुणे
पुणे वृत्तांत
वेळ - संध्याकाळी ०६.०० वा.

दिनांक – ०१/०६/२०२४ वार – शनिवार

केरळमध्ये दाखल झाल्यानंतर नैर्ऋत्य मोसमी पावसाच्या पुढील वाटचालीसाठी अरबी समुद्रात पोषक वातावरण तयार झालं असल्यानं येत्या आठवडाभरात मोसमी पाऊस पश्चिम महाराष्ट्रासह राज्याच्या विविध भागात दाखल होईल, असा अंदाज हवामानशास्त्र विभागानं वर्तवला आहे. त्यामुळं आणखी किमान आठवडाभर तरी पुणेकरांना वाढता उकाडा सहन करावा लागणार असून १० तारखेच्या आसपास पुण्यातही मोसमी पावसाच्या सरी पडतील अशी शक्यता व्यक्त होत आहे.

पुणे महापालिकेकडं वर्तमान आर्थिक वर्षात 31 मेपर्यंत 1 हजार 68 कोटी 28 लाख रुपये मिळकत कर जमा झाला आहे, अशी माहिती पुणे महापालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागाचे प्रमुख उपायुक्त माधव जगताप यांनी आज पत्रकारांना दिली. पहिल्या दोन म्हणजे एप्रिल आणि मे महिन्यात मिळकतकर भरणाऱ्या नागरिकांना 5 ते 10 टक्के सूट दिली जाते. संकेतस्थळावरील तांत्रिक बिघाडामुळं सवलतीची ही मुदत 15 जूनपर्यंत वाढवण्यात आली आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन आणि कर आकारणी विभागाला या आर्थिक वर्षाच्या पहिल्या दोन महिन्यात 308 कोटी रुपये कर प्राप्त झाला आहे. विविध कर सवलतींचा लाभ घेत 2 लाख 71 हजार 503 मालमत्ता धारकांनी कर भरणा केला. तसंच 30 जूनपर्यंत असलेल्या कर सवलतींचा लाभ घेऊन कराचा भरणा करावा, असं आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केलं आहे. शहरात 6 लाख 30 हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत.

शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी आणि त्यांना बी-बियाणं, खतं, कीटकनाशकं यांचा योग्य दर्जाचा पुरवठा होण्याकरिता राज्यभरात निविष्ठांच्या तपासणीची धडक मोहीम हाती घेण्यात आल्याची माहिती पुणे कृषी संचालक विकास पाटील यांनी दिली. यासाठी

राज्यभरात 350 भरारी पथकं कार्यान्वित करण्यात आल्याचंही त्यांनी सांगितलं. 36 हजार नमुने घेण्याचं उद्दिष्ट देण्यात आलं असून अप्रमाणित नमुन्यांप्रकरणी कडक कारवाई करण्यात येणार आहे. बियाणांचे 20 हजार, खतांचे 10 हजार आणि कीटकनाशकांचे सहा हजार नमुने तपासण्याचं उद्दिष्ट निश्चित करून काम सुरू झालं आहे. अनुदानित युरिया खताचा गैरवापर औद्योगिक कारणास्तव होऊ नये म्हणूनही उपाययोजना केल्या जात असून युरियाच्या सर्वोच्च 20 खरेदीदारांची तपासणीही क्षेत्रीय स्तरावर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

पुणे शहरातील निवासी भागांमधील पब, छतावरील क्लब आणि शैक्षणिक संस्था, धार्मिक स्थळांच्या परिसरात चालणाऱ्या बारवर तातडीनं कारवाई करावी अशी मागणी पुणे शहर भाजपच्या शिष्टमंडळानं आज पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांची भेट घेऊन केली. पुण्यात अमली पदार्थांचा वापर आणि व्यापार देखील मोठ्या प्रमाणावर होत असल्याची गंभीर चर्चा सर्वत्र सुरू आहे. वास्तविक, सामान्य पुणेकरांचा या सगळयाशी काही संबंध नाही. पुणे विद्येचे माहेरघर, सांस्कृतिक राजधानी, ऐतिहासिक वारसा असलेले शहर आहे. शिक्षणाच्या निमित्तानं लाखो लोक  राज्याच्या आणि देशाच्या वेगवेगळया भागांतून पुण्यात येतात. कल्याणीनगर अपघात प्रकरणामुळं पुण्याची प्रतिमा मलिन होत आहे. त्याचा दूरगामी परिणाम पुण्यावर होईल, असं पत्रात म्हटलं आहे.

कल्याणीनगर वाहन अपघात प्रकरणी पुणे पोलिसांनी अल्पवयीन मुलाची आई शिवानी अग्रवाल हिला अटक केली आहे. दरम्यान, या अपघातातील अल्पवयीन मुलाच्या रक्तनमुना अदलाबदल प्रकरणी पुण्याच्या न्यायवैद्यक प्रयोगशाळेत कार्यरत असलेल्या दोन महिला परिचारिकांची गुन्हे शाखेनं चौकशी केली.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्या मराठी संशोधन केंद्राच्या वतीनं आचार्य अभ्यासक्रमाचं गेल्या महिन्यात आयोजन करण्यात आलं. त्याच्या समारोप प्रसंगी पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉक्टर सुरेश गोसावी यांनी संशोधक विद्यार्थ्यांशी संवाद साधला. उच्च शिक्षण पुणे विभागाचे सह संचालक प्राध्यापक डॉक्टर केशव तुपे,

विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखीय अभ्यास शाखेचे अधिष्ठाता प्राध्यापक डॉक्टर प्रभाकर देसाई यावेळी उपस्थित होते.

पुणे जिल्ह्याच्या आंबेगाव तालुक्यातील बिबट्यांची संख्या अधिक असलेल्या क्षेत्रामध्ये वनविभागाद्वारे जनजागृती सुरू आहे. नियमित गस्त सुरू असून, नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी आणि बिबट्याचा वावर आढळल्यास तत्काळ घोडेगाव वनविभागाला कळवावं, असं आवाहन वनपरिक्षेत्र अधिकारी महेश गारगोटे यांनी केलं आहे.

कृषी आधारित रोजगार निर्मितीसाठी शेतीला कृषी पर्यटनाची जोड द्यायला हवी, असं आग्रही प्रतिपादन पर्यटन संचालनाच्या उपसंचालक शमा पवार यांनी ऍग्रो टुरिझम विश्व यांच्यातर्फे 'कृषी पर्यटनातील संधी, शासकीय योजना आणि आर्थिक सहाय्य' या विषयावर आयोजित परिसंवादात केलं. या परिसंवादामध्ये विविध कृषी पर्यटन केंद्रांचे संचालक सहभागी झाले होते.

पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या मान्यतेनं सुरू असलेल्या एसए अजिंक्यपद करंडक' १२ वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब टी-२० क्रिकेट स्पर्धेत व्हेरॉक वेंगसरकर अकॅडमीनं अजिंक्यपद पटकावलं. अंतिम फेरीत त्यांनी एसएआरके क्रिकेट ॲकॅडमीचा ७ गडी राखून पराभव केला. स्पर्धेतील विजेत्यांना करंडक आणि रोख पारितोषिक देण्यात आले.

तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी ०६.०० वाजता, विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.